# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुसुमाग्रज अध्यासन

## मराठी राजभाषा दिनानिमित्त लेख स्पर्धा २०२२

## विषय : कुसुमाग्रजांच्या कवितांमधील सामाजिक आशय

१) या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

२) स्पर्धेचे माध्यम मराठी असून वय वर्ष १८ ते ३५ या वयोगटातील युवक-युवतींना यात सहभागी होता येईल.

३) लेख स्पर्धेसाठी 'कुसुमाग्रजांच्या कवितांमधील सामाजिक आशय' हा विषय असून लेखाची शब्द मर्यादा किमान १५०० तर कमाल २५०० इतकी आहे.

४) स्पर्धेसाठी पाठवलेला लेख स्वलिखीत असावा तसेच मुद्रीत तथा इलेक्ट्रॉनीक किंवा समाज माध्यमांवर प्रकाशित झालेला नसावा. वाङमयचौर्य आढळल्यास याची सर्वस्व जबाबदारी स्पर्धकाची असेल. लेख स्वलिखीत असल्याचे हमीपत्र स्पर्धकाने सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) लेख kusumagrajchair@ycmou.ac.in या इमेलवर attachment स्वरूपात पाठवावा. लेख युनीकोड/मंगल फॉन्ट मध्येच पाठवावा. इतर फॉन्टमधील लेख स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

६) लेखावर स्पर्धकाने आपले नाव अथवा ओळख पटेल असा कोणताही मजकूर लिहू नये.

७) स्पर्धकाने आपले नाव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक इ. तपशील स्वतंत्रपणे द्यावा.

८) स्पर्धकाने वयाचा पुरावा देणारे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

९) लेखाची hard Copy पोस्टाने खालील पत्त्यावर पाठवावी. कृपया खाजगी कुरीयरने पाठवू नये.

**डॉ. प्रवीण घोडेस्वार,**
**समन्वयक, कुसुमाग्रज अध्यासन,**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२**

१०) स्पर्धकाला स्पर्धेसाठी फक्त एकच लेख पाठवता येईल.

११) स्पर्धेसाठी नेमलेल्या परीक्षकांचा निर्णय अंतीम राहील.

१२) पारितोषीक प्राप्त लेख विद्यापीठाच्या पूर्व परवानगीने स्पर्धकाला इतरत्र प्रकाशित करता येणार नाहीत.

१३) लेख इ-मेल ने पाठवण्याची अंतीम तारीख : १० फेब्रुवारी २०२२.

१४) इ-मेल केलेल्या लेखाची प्रत पोस्टाने प्राप्त होण्याची शेवटची तारीख : १५ फेब्रुवारी २०२२. अंतीम तारखेनंतर प्राप्त झालेले लेख स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

१५) स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रासह खालील प्रमाणे रक्कम पारीतोषीक म्हणून देण्यात येईल :-

प्रथम क्रमांक रु. ५०००/- (रूपये पाच हजार मात्र)
द्वितीय क्रमांक रु. ४०००/- (रूपये चार हजार मात्र)
तृतीय क्रमांक रु. ३०००/- (रूपये तीन हजार मात्र)
उत्तेजनार्थ (एकूण ३ पारीतोषीके) प्रत्येकी रु. १०००/- (रूपये एक हजार मात्र)

**लेख पाठवण्याचा इ-मेल : kusumagrajchair@ycmou.ac.in**

**लेख इ-मेल ने पाठवण्याची अंतीम तारीख : १० फेब्रुवारी २०२२**

**लेख पोस्टाने प्राप्त होण्याची अंतीम तारीख : १५ फेब्रुवारी २०२२**

(डॉ. प्रवीण घोडेस्वार)
समन्वयक, कुसुमाग्रज अध्यासन